आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

७ जानेवारी २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- एच.एम.पी.व्ही विषाणूमुळे जनतेनं घाबरून जाऊ नये, असं केंद्रसरकारचं आवाहन/नागपूरमध्ये एचएमपीव्हीचा संसर्ग झाल्याचा केवळ संशय असल्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा खुलासा
- राज्यात सर्व वाहनांना टोल भरण्यासाठी फास्ट-टॅग अनिवार्य करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते सीबीआय च्या ‘भारत पोल’ या पोर्टलचं उद्घाटन
- दिल्ली विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर एकाच टप्प्यात ५ फेब्रुवारीला मतदान

**आणि**

- भाजपाचं राज्यात दीड कोटी प्राथमिक सदस्य नोंदणीचं उद्दिष्ट

**<><><><><>**

एच.एम.पी.व्ही विषाणूमुळे जनतेनं घाबरून जाऊ नये, असं केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलीला श्रीवास्तव यांनी म्हटलं आहे. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांबरोबर दृक्श्राव्य माध्यमात घेतलेल्या बैठकीत त्यांनी देशातली श्वसनाच्या आजारांची सद्यःस्थिती, त्याचं व्यवस्थापन तसंच HMPV संसर्गाच्या प्रकरणांचा आढावा घेतला. राज्यांनी इन्फ्लूएंझा आणि गंभीर स्वरूपाच्या श्वसन रोगांच्या व्यवस्थापनाची फळी मजबूत करावी, असे निर्देश त्यांनी दिले. राज्यांनी माहिती, शिक्षण आणि संवाद, तसंच विषाणूचा प्रसार

रोखण्यासाठी जनतेमध्ये जागरूकता वाढवावी, अशी सूचना त्यांनी केली. श्वसनाशी संबंधित आजाराची वाढती प्रकरणं हाताळण्यासाठी देश सज्ज असल्याचं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं.

**<><><><><>**

भारतात एच.एम.पी.व्ही म्हणजेच ह्युमन मेटान्यूमोव्हायरसनं बाधित आणखी दोन रुग्ण आढळून आले असले, तरी काळजी करण्यासारखी परिस्थिती नसल्याचं जागतिक आरोग्य संघटनेच्या माजी शास्त्रज्ञ डॉ. सौम्या स्वामिनाथन यांनी म्हटलं आहे.  हा विषाणू नवीन नाही, तसंच त्यामुळे सौम्य स्वरूपाचा संसर्ग होतो, असं त्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. या विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी हात स्वच्छ धुणे हा एक उपाय असून, एखादा रोगजनक विषाणू आढळून आल्यावर घाबरून जाऊ नये, असं आवाहन त्यांनी केलं आहे.  खोकला, ताप, सर्दी आणि धाप लागणे, ही या विषाणूच्या संसर्गाची लक्षणं आहेत.

**<><><><><>**

नागपूरमध्ये एचएमपीव्ही विषाणूचा संसर्ग झाल्याचा केवळ संशय असल्याचं नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ . विपीन इटनकर यांनी आज प्रसार माध्यमांना सांगितलं. संशयित नमुने आयसीएमआर एनआयव्ही कडे पाठवले असून, त्याचा अहवाल आल्यावर योग्य उपाययोजना केल्या जातील, असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

नागपूरमध्ये दोन लहान मुलांमध्ये एचएमपीव्ही संसर्गाची लक्षणं आढळून आल्याचं वृत्त प्रसारित झालं होतं, त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी हा खुलासा केला.

**<><><><><>**

एच एम पी व्ही विषाणू मुळे होणारा आजार गंभीर नसून बरा होणारा आहे, लहान मुलं , वृद्ध तसेच इतर गंभीर आजार असणाऱ्यांनी काळजी घ्यावी असं वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी म्हटलं आहे. मंत्रालयात एच एम पी व्ही विषाणूसंदर्भात झालेल्या बैठकीत ते आज बोलत होते.
सरकार लवकरच या परिस्थितीबद्दल सर्वसमावेशक दिशानिर्देश जारी करुन प्रतिबंधात्मक उपाययोजना करेल अस त्यांनी सांगितल.

**<><><><><>**

राज्यात सर्व वाहनांना टोल भरण्यासाठी फास्ट-टॅग अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळानं घेतला आहे. १ एप्रिलपासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. याशिवाय सार्वजनिक-खासगी सहभाग धोरणात सुधारणा करायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत मंत्रालयात आज ही बैठक झाली. शासनाच्या कार्यनियमावलीत सुधारणा करण्याचा निर्णयही राज्य सरकारनं आज घेतला.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नवी दिल्ली इथं सीबीआय नं विकसित केलेल्या ‘भारत पोल’ या पोर्टलचं उद्घाटन केलं. यावेळी त्यांनी सीबीआय च्या ३५ अधिकाऱ्यांना असामान्य सेवेबद्दल पोलीस पदकं प्रदान केली. विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक आणि तपासातल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी केंद्रीय गृहमंत्री पदकाचा यात समावेश आहे.

‘भारतपोल’ पोर्टल आंतरराष्ट्रीय तपासाला नव्या युगात घेऊन जाणार असल्याचं अमित शाह यावेळी म्हणाले.

इंटरपोलकडून आंतरराष्ट्रीय सहाय्य मिळवण्यासाठी विनंती प्रक्रिया सुव्यवस्थित करणं, हे ‘भारतपोल’ पोर्टलचं उद्दिष्ट असून, रेड नोटिसांसह इंटरपोलच्या इतर नोटिसा जारी करणं, याचा यात समावेश आहे.

‘भारतपोल’ पोर्टल कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना अद्ययावत माहिती मिळवण्याची सुविधा प्रदान करेल. सायबर, आर्थिक आणि संघटित गुन्हे, तसंच अमली पदार्थ आणि मानवी तस्करीसह आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी ते विकसित करण्यात आलं असून, ते सर्व लाभधारकांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणेल.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी एकाच टप्प्यात ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ८ फेब्रुवारीला मतमोजणी होईल. केंद्रीय निवडणूक आयोगानं आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली. या निवडणुकीसाठी १० जानेवारीला अधिसूचना प्रसिद्ध होईल, १७ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. १८ तारखेला

अर्जांची छाननी होईल, २० जानेवारी तारखेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान मतदानाच्या दिवशी संध्याकाळी जाहीर झालेली आकडेवारी आणि दुसऱ्या दिवशी जाहीर झालेली आकडेवारी यात तफावत होती. पण त्यात कुठलाही फेरफार झाला नसल्याचा निर्वाळा मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिला. मतदानाची आकडेवारी बदलणे अशक्य आहे. काही मतदान केंद्रांवरुन अधिकारी कर्मचारी रात्री उशिरा किंवा दुसऱ्या दिवशी पोहोचतात. त्यामुळं अंतिम आकडेवारी यायला वेळ लागतो, असं त्यांनी सांगितलं. प्रत्येक मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या उमेदवारांच्या प्रतिनिधीला दिलेल्या १७ सी या अर्जातली मतदानाची आकडेवारी मतमोजणीच्या वेळी पडताळून दाखवली जाते, याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात कुठलाही फेरफार करता येत नाही किंवा त्यात व्हायरस सोडता येत नाही. ईव्हीएम मध्ये अवैध मतं नसतात किंवा त्यात काही फेरफारही करता येत नाही. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयानं वारंवार विविध निकालपत्रांतून यावर शिक्कामोर्तब केल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

नवीन सदस्यनोंदणी अभियानात दीड कोटी प्राथमिक तर ५ लाख सक्रीय सदस्य मिळवण्याचं प्रदेश भाजपाचं उद्दिष्ट असल्याचं प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं आहे. मुंबईत आज ते पत्रकारपरिषदेत बोलत होते. येत्या १० जानेवारीला घर चलो अभियान सुरु करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. अहिल्यानगर इथं येत्या १२ जानेवारीला होणाऱ्या कार्यकारिणी बैठकीत सुमारे १५ हजार कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उद्घाटनसमारंभाला उपस्थित राहणार असून समारोप भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या उपस्थितीत होणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या परिवहन मंत्र्यांची बैठक घेतली. हा वार्षिक मेळावा केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातला समन्वय वाढवण्यासाठी महत्वाच्या धोरणात्मक बाबींवर सहयोगी चर्चा करण्यासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी एकसंध धोरणं पुढे नेण्यासाठी एक महत्वाचं व्यासपीठ म्हणून काम करत असल्याचं गडकरी यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

प्रादेशिक आव्हानांचा सामना करण्यासाठी, सर्वोत्तम पद्धतींचं आदान-प्रदान करण्यासाठी आणि देशभरात परिवर्तनशील धोरणांची एकसमान

अंमलबजावणी करण्यासाठी असा संवाद गरजेचा असल्याचं त्यांनी यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

इस्त्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचा स्पॅडेक्स मोहिमेचा म्हणजे अंतराळात दोन उपग्रह एकमेकांना जोडण्याचा प्रयोग लांबणीवर टाकण्यात आला आहे. त्यामुळे आज सकाळी नियोजित असणारा हा प्रयोग आता दोन दिवसांनी म्हणजे 9 तारखेला होणार आहे. इस्त्रोनं समाजमाध्यमावरून ही माहिती दिली आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे डॉकिंग प्रक्रियेला ग्राउंड सिम्युलेशनद्वारे आणखी प्रमाणीकरण आवश्यक असल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पट्टेरी वाघिणीची शिकार केल्याप्रकरणी भंडारा पोलिसांनी ३ जणांना अटक केली आहे. भंडारा जिल्ह्याच्या तुमसर वनपरिक्षेत्रात झंझेरिया बिट ७४ बी मधे एका पट्टेरी वाघाची शिकार करुन शरीराचे तुकडे जंगलात फेकले असल्याची घटना उघडकीस आली. त्यावर पोलिसांनी तातडीनं ही कारवाई केली.

**<><><><><>**

भाईंदर पूर्वच्या नक्षत्र टॉवरमध्ये सेप्टिक टँक साफ करण्यासाठी गेलेल्या एका मजुराचा गुदमरुन मृत्यू झाला तर एकाची स्थिती गंभीर असल्याचं

डॉक्टरांनी सांगितलं. पोलिस घटनास्थळी पोहोचले असून पुढील तपास सुरु आहे.

**<><><><><>**

भारताच्या त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं मलेशिया सुपर थाउजंड(१०००) बॅडमिंटन स्पर्धेच्या मुख्य फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी थायलंडच्या ऑर्निचा जोंगसाथापोर्नपर्न आणि सुकिता सुवाचाई यांचा पराभव केला.

**//<><><><><>//**